REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 4 | JANUARY - 2022

# यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या व्यवसायिक माहितीचे अध्ययन

**शुभांगी अ. भोयर**
(एम.ए. बी.एड., एम.फील.,) गृहअर्थशास्त्र, रां. तु.म.नागपूर विद्यापीठ.

## प्रस्तावना :



आदिवासी समाजाच्या विविध अडचणी संबंधी प्रगत समाजात जागतिक पातळीवर जागरूकता निर्माण करणे. दऱ्या-खोऱ्यात पहाडामध्ये जंगलाच्या आधारे जीवन जगणारे आणि नैसर्गिक पर्यावरणात वास्तव्याला असणाऱ्या आदीमानवांना आदिवासी संबोधतात.

आदिवासी समाजातील स्त्रीपुरुषांच्या श्रमविभाजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे. त्यामुळे फळे-मुळे गोळा करणे, शेतकाम करणे अशी कामे स्त्रिया करतात. आदिवासी स्त्रिया आर्थिक व्यवहारांचे मुख्य भाग शेती काम, मोलमजुरी, फळे-फुले गोळा करणे, पशुपालन, तेंदूपत्ता गोळा करणे, हस्तव्यवसाय इत्यादी आहे.

आदिवासी जमातीमध्ये स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने आर्थिक कार्य करू शकतात. आर्थिक क्रियांमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असेल तर पुरुषांना स्त्रियांच्या कामाचे महत्त्व वाटते, त्यांची आर्थिक कार्यात निरंतर सहकार्य हेच विश्व होय, हा उद्देश पुरुष मंडळींचा असतो. आदिवासी समाजाच्या स्त्रियांच्या व्यवसायिक दर्जात एक वाक्यात येत नाही. तरीही आदिवासी स्त्रिया त्या समाजातील एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

## उद्दिष्टे-

1. आदिवासी स्त्रियांच्या मुख्य व्यवसाय संबंधी उद्देशानुसार
2. पारंपारिक व्यवसायाच्या संबंधी उद्देशानुसार

## गृहितके-

1. मुख्य व्यवसाय व पारंपारिक व्यवसायानुसार होणारे परिणाम
2. व्यवसायाचा प्रकार जाणून घेणे

**नमुना निवड -** सर्वेक्षणा करिता यवतमाळ जिल्ह्यातील विविध वयोगटातील स्त्रियांची निवड केली व निर्णय प्रक्रियेतील सहभाग किती असतो हे जाणून घेतले.

**चर्चा विश्लेषण -** प्रस्तुत संशोधनात यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या निर्णय प्रक्रिया व जबाबदारी मध्ये स्थान कशा पद्धतीने आहे, याकरिता पडणा स्त्रियांची निवड केली व टक्केवारी पद्धतीने विश्लेषण केले.

### 1. वयोगट दर्शक तक्ता

| **वय** | 21 ते 30 | 31 ते 40 | 41 ते 50 | 50 चे वर | एकूण संपल्या |
|---|---|---|---|---|---|
| **संख्या** | 9 | 13 | 21 | 7 | 50 |
| **प्र.श. क्रमांक** | 18% | 26% | 42% | 14% | 100% |

सर्वेक्षण करिता नमुना म्हणून 50स्त्रियांचा विचार करण्यात आला व यात विविध वयोगटातील स्त्रियांचा सहभाग होता.

### 2. व्यवसायाचा प्रकार दर्शन तक्ता

| **व्यवसाय** | स्वत | इतरांचा | एकूण |
|---|---|---|---|
| **संख्या** | 20 | 30 | 50 |
| **प्र.श. क्रमांक** | 40% | 60% | 100% |

व्यवसाय करतांना उदरनिर्वाह योग्य व्हावा याकरिता अनेक आदिवासी स्त्रिया इतरांच्या व्यवसायाला जातात असे सांगण्याचे प्रमाण 30 (60%) आढळतात.

### 3. आदिवासी स्त्रियांच्या मुख्य व्यवसाय दर्शक तक्ता

| **व्यवसाय** | मजुरी | शेती | स्वयं व्यवसाय | शासकीय रोजगार | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| **संख्या** | 25 | 15 | 10 | 0 | 50 |
| **प्र.श. क्रमांक** | 50% | 30% | 20% | 0 | 100% |

वरील सारणी वरून मजुरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात जास्त 25 (50%) एवढे आढळले.

### 4. पारंपरिक व्यवसाय दर्शक तक्ता:

| **व्यवसाय** | रानमेवा गोळा करणे | तेंदूपत्ता गोळा करणे | पशूपालन | एकूण |
|---|---|---|---|---|
| **संख्या** | 25 | 15 | 10 | 50 |
| **प्र.श. क्रमांक** | 50% | 30% | 20% | 100% |

वरील तक्ता रानमेवा गोळा करणे, ज्यात मध गोळा करणे, मोह फुले गोळा करणे, डिंक गोळा करणे हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया जास्त 25 (50%) एवढ्या आढळल्या.

**निष्कर्ष -** प्रस्तुत लघुशोध निबंतधात 50 आदिवासी स्त्रीयांची निवड करण्यात आली. मुख्य व्यवसाय व परंपरागत व्यवसायाची माहिती घेण्यात आली. ज्यात मुख्य व्यवसाय हा मजुरी आढळून आली. मजुरी करणाऱ्या स्त्रिया 25 (50%) स्त्रिया आढळला. यावरून मजुरी हा स्त्रियांचा आर्थिक आधार असल्याने या निष्कर्ष वरून आढळले. परंपरागत व्यवसायामुळे मजुरी हाच पर्याय शिल्लक राहिला आहे. मजुरी व्यतिरिक्त त्यांना प्रगत समाजाच्या जवळ आणून त्यांचा विकास साधणे महत्त्वपूर्ण ठरते.

## संदर्भसूची:

1. आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ ,सुगावा प्रकाशन पुणे ,जुलै 2000 माटे गोविंद
2. देवगावकर सौ. शैलजा, आदिवासी ,विश्व आनंद प्रकाशन नागपूर ,जुलै 2001
3. आदिवासी विकास आर्थिक विवेचन ,मध्य प्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी भोपाल,1986 ,शर्मा ब्रह्मदेव
4. आदिवासी अस्मिता और विकास,मध्य प्रदेश हिंदी ग्रंथ आकादमी, भोपाल 1997, शुक्ला हरिलाल
5. विकास का समाजशास्त्र,रावत पब्लिकेशन्स ,जयपुर 1999 ,प्रसाद गोपीकृष्ण
6. भारतीय आदिवासी, कॅन्टीन लिटल प्रकाशन ,पुणे 2003, नागगोंडे गुरुनाथ